दैनिक
महाराष्ट्र न्यूज
February 5, 2026
Page no:4 | epaper.mahanewsnet.com

## सिलेक्टीव्ह न्यूज #




# राष्ट्रीय वीरगाथा स्पर्धेत श्रावणी संकपाळ तर चित्रकला परीक्षेत रुद्रा पवारचे देदीप्यमान यश

**पाटण :** शिवांजली शिक्षण संस्थेच्या इंग्लिश मिडीयम स्कूल मधील विद्यार्थिनींनी राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर देदीप्यमान यश मिळवून शाळेचा गौरव वाढवला आहे. भारत सरकारच्या संरक्षण आणि शिक्षण मंत्रालयातर्फे आयोजित वीरगाथा ५.० या स्पर्धेत इयत्ता ६ वी ची विद्यार्थिनी कु. श्रावणी शेखर संकपाळ हिची देशातील प्रथम १०० विजेत्यांमध्ये निवड झाली आहे. १.९२ कोटी विद्यार्थ्यांमधून तीने हे यश मिळवले असून दिल्लीत संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते तीला शौर्य पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले आहे. तसेच शालेय शिक्षण विभागाच्या शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व एंटरमिजीएट) परीक्षेत इयत्ता ८ वी ची विद्यार्थिनी कु. रुद्रा संग्राम पवार हिने राज्यात ७८ वा क्रमांक पटकावला आहे तसेच शाळेचा एलिमेंटरी व एंटरमिजीएट परीक्षेचा निकाल १००% लागला असून एलिमेंटरी ड्रॉईंग परीक्षेत एकूण १२ विद्यार्थ्यांना 'A' ग्रेड तर एंटरमिजीएट ड्रॉईंग परीक्षेत एकूण २९ विद्यार्थ्यांना 'B' ग्रेड मिळाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थीनींचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.